## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
## दिनांक :  २२/०१/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता
## आयोजित केलेल्या २४७ व्या  बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक :  २४७/३**

**विषय :-  नंदनवन नागपूर येथील  २४  '' उच्च उत्पन्न गट  '' योजनेतील टाईप  '' एफ '' व  '' जी ''  सदनिकांचे बांधकाम करण्याबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक :  ६५९२**                **दिनांक  -    २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, नंदनवन नागपूर येथील सुमारे २२३०.९८ चौ.मि.जमिनीवरील १५७ अग्रिम अंशदान योजनेअंतर्गत  २४ गाळे (एफ+जी) उच्च उतपन्न गट गाळयांच्या बांधकामाकरिता ई-निविदाद्वारे प्राप्त मे.एम.एल.बजाज ॲन्ड कं., नागपूर यांचा निविदा किंमतीपेक्षा ३.११% कमी दराचा देकार म्हणजेच रु. ४,३१,८४,८०४.११ ( समजा रु. ४,३१,८४,८०४/- रुपये चार कोटी एकतीस लाख चौ-यांशी हजार आठशे चार फक्त ) या रकमेच्या  निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक :  २४७/५**

**विषय :-  टागोर नगर, विक्रोळी येथिल नगर भूमापन क्रमांक १२३ ते १४१, १४७, १४९ ते १८०, २४२, २८२, २८७, २८८, २९१ ते ३५५ येथील म्हाडा वसाहतीचा पुनर्विकासासाठी जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करुन योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीस मंजूरी मिळणेबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक :  ६५९३ दिनांक - २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, टागोरनगर, विक्रोळी येथील नगर भूमापन क्रमांक १२३ ते १४१, १४७, १४९ ते १८०, २४२, २८२, २८७, २८८, २९१ ते३५५ येथे ६७.८६ हेक्टर जमिनीवरील म्हाडा वसाहतीचा पुनर्विकासाची योजना ही १. सदर योजना १०० टक्के म्हाडाने बांधकाम घेऊन ठेकेदार नियुक्तीची प्रक्रीया करणेत यावी. २. प्रायोगिक तत्वावर ४ सेक्टर पैकी १ सेक्टरचा प्रथम पुनर्विकास करण्यात यावा.

या पध्दतीने राबविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४७/६**

**विषय :- म्हाडामार्फत घरांच्या विक्रीसाठी काढण्यात येत असलेल्या सोडतीमध्ये सुधारणा करण्यासाठी माजी उपलोकायुक्त मा.सुरेशकुमार यांची समिती नेमणेसाठी बाब टिप्पणी ( Item Note ) सादर करणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५९४** **दिनांक - २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, म्हाडामार्फत घरांच्या विक्रीसाठी काढण्यात येत असलेल्या सोडतीमध्ये सुधारणा करण्याकरिता तसेच माहिती पुस्तिकेत आढळून येणा-या त्रुटी दूर करण्याकरिता माजी उपलोकायुक्त मा.सुरेशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीस मंजूरी देण्यात येत आहे.

१. श्री.सुरेशकुमार ( माजी उपलोकायुक्त महाराष्ट्र शासन ) - अध्यक्ष
२. मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ - सदस्य
३. विधी सल्लागार / प्रा. - सदस्य
४. मुख्य अधिकारी / कोंकण मंडळ - सदस्य
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. - सदस्य
६. सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ - सदस्य
७. उपमुख्य अधिकारी ( मि.व्य.-१) / सदस्य सचिव

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक :  २४७/९**

**विषय :- हिंगोली येथील सर्व्हे क्रमांक १४३ ( भाग ) या जमिनीवरील ८० गाळे अल्प उत्पन्न गट, ९ दुकाने व २ सुविधा हॉल तसेच ३० गाळे मध्यम उत्पन्न गट, ४ दुकाने, २ सुविधा हॉल गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाच्या निविदा स्विकृतीबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक :  ६५९५**  **दिनांक  -  २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, हिंगोली येथील सर्व्हे क्र.१४३ ( भाग ) या जमिनीवरील ८० गाळे अल्प उत्पन्न गट, ९ दुकाने व २ सुविधा हॉल योजनेच्या बांधकामाची मे.वेलकीन बिल्डर्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या ९.९९ टक्के अधिक दराने रु. ४,७०,८३,७९०/- रकमेच्या निविदेस तसेच ३० गाळे मध्यम उत्पन्न गट, ४ दुकाने, २ सुविधा हॉल योजनेच्या बांधकामाची मे.वेलकीन बिल्डर्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या ९.९९ टक्के अधिक दराने रु. २,४७,०३,५३४/- रकमेची प्राप्त निविदा या दोन्ही निविदा स्विकृतीस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४७/१०**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील भूमापक आणि तारतंत्री संवर्गाकरिता सेवाप्रवेश नियम तयार करणेबाबत -**
**- नामनिर्देशनाद्वारे विहित पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांकडून आकारावयाच्या परीक्षा शुल्काबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५९६** **दिनांक - २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरताना निवड प्रक्रियेकरिता आय.बी.पी.एस. या संस्थेचे आकारण्यात येणारे शुल्क व प्रशासकीय बाबींकरिता येणारा खर्च पाहता सर्वसाधारण गटातील उमेदवारांसाठी रु. ४००/- प्रति पदासाठी आणि मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी रु. २००/- प्रतिपदासाठी प्रशासकीय आकार आकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या आकारातून प्राप्त होणारी रक्कम वजा जाता उर्वरित खर्च प्राधिकरणाने करावा. यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवारील भूमापक व तारतंत्री या संवर्गाचे सेवा प्रवेश नियम अनुक्रमे महसूल व वन विभागाचे अधिपत्याखालील भूमिअभिलेख विभागातील सेवाप्रवेश नियमाचे धर्तीवर भूमापक या पदाचे व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील वीजतंत्री या पदाचे सेवा प्रेवश नियम विचारात घेऊन त्याप्रमाणे तारतंत्री या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करुन शासनाचे मान्यतेसाठी पाठवावे. यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**<u>बाब क्रमांक : २४७ /१२</u>**

**विषय - हुतात्मा स्मारक समिती, आष्टी जि.वर्धा व महिला विकास संस्था, वर्धा या संस्थेस मंजूर झालेल्या भूखंडाची किंमत कमी करण्याबाबत.**

--------------------

**ठराव क्रमांक : ६५९७ दिनांक : २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, हुतात्मा स्मारक समिती,आष्टी,जि.वर्धा व महिला विकास संस्था,वर्धा या संस्थांनी म्हाडाच्या किंमत विषयक प्रचलित धोरणानुसार शीघ्रसिध्दगणकाचा दर रु. १२२४/- प्रती चौ.मी. [ भूखंडाच्या किंमतीचाभरणा दिनांक ३१/३/२०१३ पर्यंत होईल असे गृहित धरुन दिनांक ३१/३/२०१३ पर्यंत व्याजाची आकारणी करुन ] या दराने नागपूर मंडळाकडे भरणा करावा.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४७/१३**

**विषय - सोलापूर सिटी स.क्र. ३२०/अ/१ मजरेवाडी,
ता.उत्तर सोलापूर [ जुळे सोलापूर भाग-१ ] येथील
शाळेसाठी राखीव असणा-या भूखंडाच्या वाढीव
क्षेत्रफळाची किंमत वर्षभरात चार हप्त्यात भरण्यास
परवानगी मिळणेबाबत.**

------------------------

**ठराव क्रमांक : ६५९८** **दिनांक : २२/०१/२०१३**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांनी भूखंडाच्या वाढीव क्षेत्राची चालू बाजाारभावाने / शीघ्रसिध्दगणकाप्रमाणे भरावी लागणारी रक्कम एकाच वेळी पुणे मंडळात भरणा करावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पहाता तात्काळ करण्यात यावी.